जनसामान्यांच्या मनातील आरसा
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | शुक्रवार
२१.०८.२०२६

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २०२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## तिने मला प्रेमात फसवलं, शेवटची चिठ्ठी लिहून प्रियकराने संपविले जीवन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – नाशिकच्या गंगापूर रोडवरील ध्रुवनगरमध्ये २६ वर्षीय वरुण भामरे या तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत प्रेयसीसह तिघांवर गंभीर आरोप केले आहेत. 'प्रेमात फसविले, माझ्याकडून हवे तेवढे कॅश काढून घेतले' असा चिठ्ठीत उल्लेख केला आहे. 'काल रस्त्यात अडवून मारहाण केली, तू मर नाही तर...' अशी धमकी दिल्याचा आरोप त्याने केला आहे. संबंधितांकडून घेतलेले पैसे परत मागितल्याने धमकावल्याचा वरुणचा दावा आहे. पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्याकडे चिठ्ठीतून न्यायाची मागणी देखील केली आहे, त्याचबरोबर 'यांना शिक्षा करा' अशी विनंती देखील त्याने शेवटच्या चिठ्ठीत केली आहे.



गंगापूर पोलिसांनी चिठ्ठी ताब्यात घेतली असून अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

**शेवटच्या चिठ्ठीत नेमकं काय-काय म्हटलंय?**

'तिने मला प्रेमात फसवले, हवे तेवढे कॅश काढून घेतले अनब मला धमकावून तू मर नाही तर...' असे सांगून रस्त्यात अडवून मारहाण केल्याचा आरोप 'सुसाइड नोट'मध्ये करत एका वरुण भाऊसाहेब भामरे (२६, रा.गोकुळधाम, ध्रुवनगर, गंगापूर) याने गुरुवारी (दि.२०) सायंकाळी गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. त्याने संबंधितांची नावे चिठ्ठीत लिहून न्यायव्यवस्थेवर विश्वास असल्याचे सांगून 'प्रतिक्षा करावी लागली तरी चालेल, पण यांना शिक्षा करा' अशी थेट पोलिस आयुक्तांकडे मागणी केली आहे. गंगापुररोडवरील ध्रुवनगरमध्ये राहणाऱ्या वरुणचे एका युवतीवर प्रेम होते. त्याने आयटीआयपर्यंतचे शिक्षण घेतले होते. तो आपल्या कुटुंबासमवेत गोकुळधाम सोसायटीत राहत होता. त्याने राहत्या घरात त्याच्या रूममध्ये अचानकपणे काल सायंकाळी चिठ्ठी लिहून गळफास घेत जीवन संपवले आहे. वरूणला बेशुद्धावस्थेत त्याचा मावसभाऊ तेजस पवार याने शासकीय जिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्याने तपासून वरुणला मृत घोषित केले.

### एका प्रेयशीसाठी दोन कुख्यात गुंडांचा संघर्ष

## रक्तरंजीत त्रिकोणी प्रेमप्रकरणाने नागपुरात हारदले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपूर** – नागपूरच्या नरेंद्र नगरमध्ये सुंदरबन परिसरात 'त्रिकोणी' प्रेमसंबंधातून निर्माण झालेल्या वादाचे पर्यवसान कुख्यात हिस्ट्रीशीटर गौरव रगडे याच्या निर्घृण हत्येत झाले. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या रगडेवर त्याच्याच मित्रांनी कुऱ्हाडीने वार करून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी गौरव प्रभाकर राऊत आणि दीपक वासनिक या दोघांना आरोपी केले आहे. गौरव रगडे हा कुख्यात गुन्हेगार होता. त्याच्याविरुद्ध दरोड्यासह अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. अजनी पोलिस ठाण्यात त्याच्याविरुद्ध हत्या, हत्येचा प्रयत्न यासह सुमारे नऊ गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, गौरव रगडे याचे मागील दोन वर्षांपासून सुंदरबन परिसरात



राहणाऱ्या सपना नावाच्या मुलीसोबत प्रेमसंबंध होते तर नरेंद्रनगर परिसरात राहणाऱ्या गौरव राऊत याचीही सपनासोबत मैत्री होती. या मैत्रीचे पुढे प्रेमसंबंधात रूपांतर झाले. गौरव राऊत हा यवतमाळच्या दिग्रस येथील रहिवासी होता. तो सपनासाठी नागपूरला राहायाला आला. त्यानंतर गौरव राऊत याने सपनासोबत 'क्लाऊड किचन' सुरू केले होते. तो हॉटेलजवळच भाड्याच्या घरात राहत होता. यानंतर गौरव रगडेच्या साथीदारांनी राऊतशी वाद घालायला सुरुवात केली होती. सपना आणि गौरव रगडे यांच्यातील प्रेमसंबंधाची माहिती राऊतला होती. त्यातून दोघांमध्ये वाद निर्माण झाला. या वादातून गौरव रगडे आणि गौरव राऊत यांच्यातील संघर्ष वाढत गेला. अखेर सुंदरबन परिसरात गौरव रगडेवर कुऱ्हाडीने वार करून त्याची हत्या करण्यात आली. या हत्येच्या गुन्ह्यातील आरोपी गौरव राऊत हा दोन आठवड्यांपूर्वीच कारागृहातून जामिनावर बाहेर आला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली. त्यामुळे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या आरोपींच्या या कृत्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सध्या पोलिसांकडून आरोपींची चौकशी सुरु असून त्यामधून या सगळ्या घटनेचा उलगडा होण्याची शक्यता आहे. गुरुवारी गौरव राऊत याच्या नरेंद्रनगर परिसरातील घरी दारुची पार्टी सुरु होती. सपना हीदेखील तिकडे होती. गौरव रगडेला याची माहिती मिळाली. तेव्हा तो तिकडे आला. त्याने घराच्या दरवाजा बंद असल्याने जोरदार धडका दिल्या. तरीही दरवाजा उघडला जात नसल्याने त्याने खिडकीच्या काचा फोडल्या. तेव्हा त्याला आतमध्ये सपना ही गौरव राऊतसोबत दिसली. तेव्हा गौरव रगडे आणखी संतापला. तेव्हा गौरव राऊतने दुसऱ्या मार्गाने तिथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. गौरव रगडे आणि गौरव राऊत यांच्यात या परिसरात रस्त्यावर जीवघेणी झुंज झाली. हे दोघे एकमेकांना जवळपास अर्धा तास मारत होते. या दोघांची हाणामारी अजनी परिसरात सुरु झाली, तिथून मारामारी करत हे दोघे बेलतरोडी पोलिसांच्या हद्दीत पोहोचले. दोघेही एकमेकांना ऐकत नव्हते. तेव्हा गौरव राऊत याने गौरव रगडे याने कमरेच्या बेल्टजवळ लावलेला चाकू काढून त्याच्या छातीत घुसवला.

### थोडक्यात

## क्रेन आणि जेसीबी दोन्ही खाली कोसळुन अनेक जखमी : आकडा अधांतरी


(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबईच्या कुर्ला परिसरात शुक्रवारी पहाटे एक भीषण दुर्घटना घडली. एका क्रेनच्या साहाय्याने जेसीबी उचलत असताना ही दुर्घटना घडली. क्रेनने जेसीबी मशीन हवेत उचलल्यानंतर, ती बऱ्याच उंचावर असताना अचानक क्रेन आणि जेसीबी दोन्ही खाली कोसळले. या अपघातात खाली उभे असणारे आठ ते दहा जण जखमी झाल्याची माहिती आहे. पहाटे ३ वाजून ४० मिनिटांच्या सुमारास ही दुर्घटना घडली. अद्यापपर्यंत या दुर्घटनेत जखमी झालेल्यांपैकी कोणाचाही मृत्यू झाल्याचे वृत्त नाही. या दुर्घटनेत आठ ते दहा जण जखमी झाल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

## सुप्रिम कोर्टात वकिलांनी चढविला कळस : शिवसेना पक्ष अन चिन्हाबाबत सुनावणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह कोणाचं, हा वाद अद्यापही संपूर्णपणे मिटला नसून सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी सुरू आहे. ठाकरेंच्या शिवसेना पक्षाच्यावतीने वरिष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी प्रभावी मांडणी, युक्तिवाद केल्यानंतर आता यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीत आज ठाकरेंच्या बाजूने अ‍ॅड. देवदत्त कामत यांनी युक्तीवाद केला. या युक्तिवादात त्यांनी देशातील इतर महत्त्वाच्या खटल्यांचा दाखला दिला. विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष हे दोन्ही वेगळं असल्याचे सांगत त्यांनी उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पश्चिम बंगालमधील खटल्यांची माहिती दिली. त्यामुळे, सर्वोच्च न्यायालयात ठाकरेंची बाजू भक्कम झाल्याचा दावा करण्यात येतोय. त्यावर, आता ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. कालच्या सुनावणीत अ‍ॅड.देवदत्त कामत यांनी युक्तीवादचा कळस चढवला., कामत यांनी युपी, केरळ, हरियाणा आणि कलकत्ता येथील निकालाचे उदाहरण दिले.



त्यामुळे, आजच्या युक्तिवादाने कोर्ट प्रभावित झाले असेल तर आनंद आहे. चिन्हाबाबत युक्तिवाद केला. माझ्यासोबतचा माणूस गेला तर तो पक्षाचा प्रमुख बनतो का? असा सवाल वकिलांनी केला. यावेळी सादिक अली, सुभाष देसाई केसचा उल्लेख करण्यात आल्याची माहिती अरविंद सावंत यांनी दिली. पक्ष आणि विधीमंडळ पक्ष यात फरक आहे, पक्ष हा निरंतर आहे. पक्षातील माणसं गेली म्हणजे पक्ष जात नाही. पुन्हा निवडणूक आयोगाकडे आम्हाला पाठवू नका अशी विनंती कोर्टाला केली आहे. आता, यावर निर्णय घेण्याचा अधिकार कोर्टाचा आहे. मात्र, एकनाथ शिंदेंसोबतचे आमदार अपात्र झाले तर पक्षाचा विषयच येत नाही. चिन्ह देण्याचा प्रश्नच येत नाही, असे म्हणत अरविंद सावंत यांनी पक्ष आणि चिन्ह आम्हालाच मिळेल, असा दावा केलाय.

**शिंदेंच्या प्रवक्त्याची प्रतिक्रिया**

एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे प्रवक्ते राजू वाघमारे यांनी सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीवर प्रतिक्रिया दिली आहे. उबाठा यांचा विश्वास निवडणूक आयोगावर नाही, विधी अध्यक्षांवर नाही आणि यापूर्वीच्या निकालावरही विश्वास नाही. उद्या हा निकाल ठाकरे विरोधात गेला तर पुन्हा म्हणतील कोर्टावरही विश्वास नाही, अशी टीका राजू वाघमारे यांनी केली. तसेच, २०१८ ची घटना योग्य होती की नव्हती हे ठाकरे सांगत नाहीत. निवडणूक आयोगाला निर्णय घेण्याचा अधिकार नाही असं म्हणतात.

## अभिजीत दिपकेंचा आता मंत्री दादा भुसेंवर निशाणा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – महाराष्ट्रातील शाळांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळत नसतील, तर याची जबाबदारी नेमकी कोणाची? असा सवाल उपस्थित करून शिक्षण व्यवस्थेची ही अवस्था पाहता राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे, अशी प्रतिक्रिया कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी दिली आहे. लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील



उजनी इथल्या जिल्हा परिषद शाळेला भेट दिल्यानंतर ते बोलत होते. शिक्षणमंत्र्यांनी आणि आमदारांनी स्वतःच्या मुलांना शिक्षणासाठी आधी जिल्हा परिषद शाळेत पाठविले पाहिजे, असेही ते म्हणाले. औसाच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत खाजगी शाळेचे विद्यार्थी देखील आढळून आले. अभिजीत दिपकेंच्या समोरच विद्यार्थ्यांनी याबाबतची कबुली दिली आहे. औसा शहरात असलेली जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे खासगी शाळा पीपल्स प्रायमरी स्कूलचे विद्यार्थी आढळून आले आहेत. स्कूल ठीक करो अभियानांतर्गत अभिजीत दिपके यांनी सुरू केलेल्या अभियानात ही माहिती आढळून आलेली आहे. 'स्कूल ठीक करो' अभियानाच्या माध्यमातून लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेले कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी औसा तालुक्यातील उजनी येथील जि.प.शाळेला भेट दिली.

## साखरेच्या दरात पुन्हा ऐतिहासीक वाढ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – सध्या राज्यातील बाजारपेठेत साखरेनं मोठी उसळी घेतल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या साखरेच्या वाढत्या दराचा ग्राहकांना मोठा फटका बसत आहे. सध्या साखरेच्या इतिहासात सर्वात मोठी वाढ झाली आहे.

साखर ७ हजार ५०० प्रति क्विंटलवर गेली आहे. तर वाशिम जिल्ह्यात किरकोळ बाजारात साखरेचे दर ८० रुपयांवर गेले आहेत. याचा ग्राहकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. दरम्यान, आगामी काळात साखरेच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे साखरेच्या वाढत्या दराचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर होण्याची शक्यता आहे.

**हिंगोलीत साखरेचे दर तब्बल ७५ रुपये**

हिंगोलीत साखरेचे दर तब्बल ७५ रुपये किलोपर्यंत पोहोचलेत. साखरेच्या दरात झालेली ही मोठी वाढ आता थेट मिठाई व्यवसायाच्या गणितावर परिणाम करू लागली आहे. कारण मिठाई तयार करण्यासाठी साखर हा सर्वात महत्त्वाचा आणि मोठ्या प्रमाणात वापरला जाणारा घटक आहे. त्यामुळे साखर महागली आणि मिठाई विक्रेत्यांचा उत्पादन खर्चही वाढला आहे. याचा परिणाम मिठाईच्या दरांवर होण्याची शक्यता आहे.

**मिठाईचे दर वाढणार**

शहरातील मिठाईच्या दुकानांमध्ये सकाळपासूनच विविध प्रकारच्या मिठाई तयार करण्याची लगबग पाहायला मिळते. पेढे, बर्फी, गुलाबजामुन, जिलेबी, लाडू अशा अनेक मिठाई तयार करताना मोठ्या प्रमाणात साखरेचा वापर केला जातो. मात्र, साखरेचे दर वाढल्याने आता मिठाई विक्रेत्यांच्या खर्चाचा ताळमेळ बिघडला आहे.




# स्व.पंचफुलाबाई पावडे महिला महाविद्यालयात ध्वजारोहण व 'हर घर तिरंगा' रॅली उत्साहात

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्व.पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .




ध्वजारोहण कार्यक्रमाची सुरुवातीला मुख्य अतिथी कृषी उत्पन्न बाजार समिती माजी संचालक निळकंठ आंडे, प्राचार्य डॉ.साजिद अनवर यांनी भारत माता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतिमांचे पुजन व त्यास हारार्पण केले. सकाळी ८ वाजता मुख्य अतिथी निळकंठ आंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

ध्वजारोहण कार्यक्रमाचे संचालन रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.अरविंद तट्टे यांनी केले. त्यानंतर रा.से.यो.पथकाच्या वतीने 'हर घर तिरंगा' रॅलीचे आयोजन प्राचार्य डॉ.साजिद अनवर, रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.अरविंद तट्टे यांच्या मार्गदर्शनात बाजुच्या वस्तीमध्ये आयोजन करण्यात आले.

रॅलीची सुरुवात मुख्य अतिथी निळकंठ आंडे यांनी रॅलीला हिरवी झेंडी देऊन केली. याप्रसंगी निळकंठ आंडे, प्राचार्य डॉ.साजिद अन्वर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हातात तिरंगा ध्वज घेऊन मोठ्या उत्साहाने रॅलीत सहभागी झाले होते. रा.से.यो.च्या स्वयंसेविकांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन देशभक्तीपर गीते गाऊन व घोषणा देऊन आजुबाजुचा परिसर दुमदुमून टाकला. रॅलीच्या समापनानंतर मान्यवरांचेहस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ.विवेक देशमुख , डॉ.अनिल कडू, डॉ.प्रदीप ढोले, डॉ.मनोज राठोड, डॉ.लिना गावंडे, डॉ.फरहीना शिरीन, ग्रंथपाल डॉ.कविता इंगळे, प्रशांत इंगळे, आशिष लुंगे, प्रफुल्ल किटुकले, लक्ष्मण सावलकर, संजय वर्धे, इंदिरा खेरडे तसेच अनेक रा.से.यो. स्वयंसेविकांनी अथक परिश्रम घेतले.

---

## नवयुवक शिक्षण संस्था संचालित

# एनटीआर हायस्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – नवयुवक शिक्षण संस्था संचालित एन.टी.आर.हायस्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी वरुड–मोर्शी तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवुन शाळेचा नावलौकिक वाढविणारा गुणवंत विद्यार्थी संयम मनीष विटाळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शशांक पाचघरे यांच्या मार्गदर्शना खालील बँड पथकाने देशभक्तीपर धुन सादर करुन कार्यक्रमात उत्साह निर्माण केला. विद्यार्थ्यांनी सुंदर वर्ग रंगसजावट करुन शाळेचा परिसर आकर्षक पद्धतीने सजविला तसेच देशभक्तीपर गीतांचे सामुहिक गायन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व, राष्ट्र प्रेम, स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान आणि देशाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याविषयी मनोगत व्यक्त केली.

यावेळी मुख्याध्यापक योगेश बरडिया, पर्यवेक्षक शशांक पाचघरे, नवयुवक शिक्षण संस्थेचे पदाधिकारी पी.एल.कळमकर व जगदीश नेरकर, माजी शिक्षक, पालक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. योगेश बरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

---

# श्री क्षेत्र नागठाणा येथे अच्युत महाराजांच्या मुर्तीचा वर्धापन दिन

**सचिन देव महाराज, ग्रामगीताचार्य लक्ष्मणरावदादा गीद यांची उपस्थिती**



■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – निसर्ग रम्य वातावरणात नुकताच वं.श्री संत अच्युत महाराज यांच्या मुर्तीचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

हा वर्धापन दिन सचिन देव महाराज, ग्रामगीताचार्य लक्ष्मणरावदादा गीद उपस्थितीत साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे नागठाणा क्षेत्र येथे सेवा देणारे सातनुरच्या भजनी महिला मंडळांनी सुंदर अशी भजने सादर केली. सचिन देव महाराज, लक्ष्मणरावदादा गीद यांनी वर्धापन दिनानिमित्त बोधप्रद प्रवचन केले. त्यानंतर ओम नमः शिवाय जप, ओम अच्युत आय नमः जप नंतर वं.श्री संत अच्युत महाराज यांची आरती, राष्ट्रवंदना, जय घोष नंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

श्री संत अच्युत महाराज यांच्या मूर्तीचा वर्धापन दिनानिमित्त महाप्रसादाचे दाते अच्युत भक्त राजु ढोरे होते.

---

# न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलमध्ये १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक ए.बी.चौधरी होते. कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद ज्ञानेश्वर बहुरुपी, अरविंद शेळके, रविंद्र कानुगो, दिपक भुयार, अशोक वडस्कर, दिलीप खासबागे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. यावेळी इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त परीक्षा देण्याची शपथ घेतली. विद्यार्थ्यांनी परीक्षेत प्रामाणिकपणा व शिस्त पाळण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आकर्षक एनसीसी ड्रिल, गाईड डान्स, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, गायन तसेच देशभक्तीपर गीतांचे सुंदर सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण वातावरण देशभक्तीच्या भावनेने भारावुन गेले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित हा स्वातंत्र्य दिनाचा सोहळा उत्साहपुर्ण वातावरणात संपन्न झाला.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

---

# नगरपरिषद शेंदुरजनाघाट येथे १५ ऑगष्ट स्वतंत्र दिनानिमित्त ध्वजारोहण

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

***शेंदुरजनाघाट*** – स्थानिक नगरपरिषद येथे १५ ऑगष्ट स्वातंत्र दिनानिमित्त नगरपरिषद येथील सर्व शाळा,आठवडी बाजार मलकापूर व नगरपरिषद कार्यालय येथे ध्वजारोहण नगरपरिषद येथील पदाधिकारी यांच्या हस्ते संपन्न झाले.



यावेळी सर्वप्रथम नगरपरिषद शाळा क्र.३ येथील ध्वजारोहण शिक्षण व आरोग्य सभापती निलिमा उमेश कुबडे, नगरपरिषद मराठी प्राथमिक शाळा क्र.१ व उर्दू शाळा येथील ध्वजारोहण बांधकाम सभापती ओमप्रकाश कांडलकर, नगरपरिषद मराठी शाळा क्र.४ येथील ध्वजारोहण स्थायी समिती सदस्य प्रशांत सावरकर, नगरपरिषद शाळा क्र.२ येथील ध्वजारोहण महिला व बालकल्याण सभापती प्रिया नेपाल पाटील, आठवडी बाजार मलकापूर येथील ध्वजारोहण उपाध्यक्ष तथा पाणीपुरवठा सुनिता जीवन वंजारी व नगरपरिषद कार्यालयासमोरील ध्वजारोहण नगराध्यक्ष सुवर्णा वरखेडे हस्ते संपन्न झाले.

यावेळी सर्व नगरसेवक, नगरपरिषद कर्मचारी व गावातील प्रतिष्ठित नागरिकासह सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगरपरिषद निवडणूक पार पडल्यानंतर प्रथमच स्वातंत्र्य दिनाचा हा सो–हळा नवनिर्वाचित नगराध्यक्ष नगरसेवक यांच्या उपस्थितीत पार पडल्यामुळे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता.

---

# जरुडात ठिकठिकाणी स्वातंत्र्य दिन उत्साह व आनंदात साजरा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

***जरुड*** – येथे भारतीय स्वातंत्र्याचा ७९ वा स्वातंत्र्य दिन ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला.






त्यानिमित्त विविध कार्यक्रमासह सर्व शाळांची संपुर्ण गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. त्यावेळी संपुर्ण परिसरात उत्साह व आनंदाचे वातावरण तयार झाले होते. सोबत पोलीस चौकी जरुड, जि.प.प्राथमिक मुलांची व मुलींची शाळा, ॲलोपॅथिक दवाखाना, बारी समाज सेवा सदन, बाळासाहेब देशमुख कन्या शाळा, जरुड हायस्कूल जरुड, वसंतराव नाईक हायस्कूल, जि.ह.देशमुख कनिष्ठ विद्यालय, कला वाणिज्य महाविद्यालय, अध्यापक विद्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, साई मंदिर परिसर, गांधी चौक, नेहरू चौक, होळी चौक, त्रिमूर्ती नागरी सहकारी पतसंस्था आदी ठिकाणी धजारोहण करण्यात आले.

---

# राष्ट्रीय दिव्यांग पार्टीच्या तालुकाध्यक्षपदी हिराचंद पवार यांची निवड

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील शासकीय विश्रामगृहात पार पडलेल्या राष्ट्रीय दिव्यांग पार्टीच्या अमरावती जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत तालुकाध्यक्षपदी हिराचंद पवार यांची अधिकृत घोषणा करून त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष राजेंद्र घाटोळे तर प्रमुख पाहुणे म्हणुन उपाध्यक्ष सोमेश्वर शहाणे उपस्थित होते. या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांमध्ये तालुकाध्यक्ष हिराचंद रामचंद्र पवार, मोर्शी तालुकाध्यक्ष प्रफुल दामोदर मावळे यांची नियुक्ती करुन त्यांना पक्षाच्या ध्येय धोरणांशी एकनिष्ठ राहण्याची जिल्हाध्यक्षांनी शपथ दिली. यासोबतच महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीही यावेळी जाहीर करण्यात आल्या. या बैठकीत उपस्थितांनी युडीआयडी कार्डवर एसटी प्रवासादरम्यान येणाऱ्या अडचणी मांडल्या. यावर पदाधिकाऱ्यांनी तात्काळ राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत समस्येचे निराकरण केले तसेच ग्रामपंचायतमार्फत मिळणाऱ्या ५ टक्के निधीच्या वाटपातील त्रुटींवर बोलतांना सोमेश्वर शहाणे यांनी राज्यस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

राजेंद्र घाटोळे यांनी उपस्थितांना दिव्यांगांसाठीच्या विविध शासकीय कल्याणकारी योजनांची माहिती दिली. या सभेला दोन्ही तालुक्यांतील दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्राईमरी स्कूल येथे स्वातंत्र्य दिन

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – लोणी येथील न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्राईमरी स्कूल येथे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष व ध्वजारोहक प्रदीप झाडे, अतिथी म्हणून अविनाश सोनारे, अश्विन दवंडे, बापूराव मेंढे, राजु मालपे, मुख्याध्यापिका जया बारमासे उपस्थित होत्या. प्रदीप झाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. त्यानंतर शाळेच्या विद्यार्थ्यांनी उद्देशिका, प्रतिज्ञा, नारे यांचा जयघोष केला. तेरा हिमालय आकाश छुले या गाण्यावर संपुर्ण शाळेच्या विद्यार्थ्यांनी नृत्य प्रस्तुत करून वातावरण भारावुन टाकले. केजी टू च्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. चिमुकल्यांनी विविध देशभक्तांनी वेशभूषा केली. उपस्थित पाहुण्यांनी आपली मते व्यक्त केली आणि विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व, स्वातंत्र्य कसे मिळाले, विविध स्वातंत्र्यसैनिकांचे जीवन चरित्र तसेच स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवन चरित्रावरून आपण काय बोध घ्यावा? असे सुचविले आणि देशाचे जबाबदार नागरिक बनावे, असे आवाहन केले .

संचालन रूपाली लोखंडे आणि रूपाली बारस्कर यांनी केले. त्यानंतर संपूर्ण शाळेची ग्रामपंचायत लोणी येथे रॅली काढून ग्रामपंचायत मधील झेंडावंदन करिता उपस्थिती दर्शविली.

# संपादकीय

## परिस्थिती कितीही कठीण असो, प्रयत्न सोडू नका

### एआय मुळे नुकसान की फायदा?

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय ही आता केवळ विज्ञान-कथांमधील संकल्पना राहिलेली नाही. शिक्षण, आरोग्य, उद्योग, शेती, बँकिंग, पत्रकारिता आणि प्रशासन अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रात एआय चा वापर वेगाने वाढत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात मानवी जीवन आणि कामकाजाची पद्धत मोठ्या प्रमाणात बदलणार हे स्पष्ट आहे.

एआय मुळे अनेक कामे अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येत आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मदत, डॉक्टरांना निदानात सहाय्य, शेतकऱ्यांना हवामान व पिकांच्या नियोजनाची माहिती, तसेच उद्योगांना उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी एआय उपयुक्त ठरत आहे. त्यामुळे अख कडे केवळ धोका म्हणून पाहण्यापेक्षा त्यातील संधी ओळखणे गरजेचे आहे.

मात्र, एआय मुळे काही पारंपरिक नोकऱ्यांवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वारंवार होणारी आणि नियमबद्ध कामे मशीनद्वारे केली जाऊ लागल्यास काही रोजगारांच्या स्वरूपात बदल होईल. त्यामुळे युवकांनी घाबरून जाण्यापेक्षा नवीन कौशल्ये, तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि सर्जनशील विचार आत्मसात करणे आवश्यक आहे. एआय च्या वापरासोबत काही गंभीर प्रश्नही निर्माण झाले आहेत. चुकीची माहिती, बनावट फोटो-व्हिडिओ, गोपनीयतेचा भंग आणि एआय चा गैरवापर यामुळे समाजासमोर नवी आव्हाने उभी राहत आहेत. त्यामुळे एआय च्या विकासाबरोबरच त्याच्या जबाबदार आणि नैतिक वापरासाठी योग्य नियमांचीही आवश्यकता आहे. आजच्या युवकांसमोरचे खरे आव्हान एआय थांबवणे नाही, तर अख सोबत स्वतःला सक्षम बनवणे हे आहे. शिक्षणपद्धतीत तंत्रज्ञानाधारित कौशल्यांना स्थान देऊन विद्यार्थ्यांना भविष्यातील रोजगारासाठी तयार करावे लागेल. सरकार, शैक्षणिक संस्था आणि उद्योगांनी यासाठी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवाची जागा घेण्यासाठी नव्हे, तर मानवाची क्षमता वाढवण्यासाठी वापरली गेली पाहिजे. योग्य नियोजन, कौशल्यविकास आणि नैतिक वापर यांचा समन्वय साधला, तर एआय हे रोजगार हिरावून घेणारे संकट न ठरता नव्या रोजगाराच्या संधी निर्माण करणारे शक्तिशाली साधन ठरू शकते.

**रोजगाराचे स्वरूप बदलेल**

एआय मुळे काही पारंपरिक कामे कमी होऊ शकतात; मात्र त्याचवेळी एआय तज्ज्ञ, डेटा विश्लेषक, सायबर सुरक्षा तज्ज्ञ, एआय प्रशिक्षक अशा नव्या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

**कौशल्यविकास अत्यावश्यक**

फक्त पदवी मिळवणे पुरेसे राहणार नाही. संगणकाचे ज्ञान, अख साधनांचा योग्य वापर, डेटा हाताळणी, संवादकौशल्य आणि सर्जनशील विचार यांना भविष्यात अधिक महत्त्व असेल.

**शिक्षण क्षेत्रात मोठा बदल**

एआय विद्यार्थ्यांना वैयक्तिक पद्धतीने शिकण्यास मदत करू शकते. मात्र विद्यार्थ्यांनी अख वर पूर्ण अवलंबून न राहता स्वतः विचार करण्याची आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करणे आवश्यक आहे.

**ग्रामीण भागासाठीही संधी**

एआय चा फायदा केवळ शहरांपुरता मर्यादित राहू नये. शेतकऱ्यांना हवामानाचा अंदाज, पिकांवरील रोगांची माहिती, बाजारभाव आणि आधुनिक शेती तंत्रज्ञान याबाबत एआय उपयुक्त ठरू शकते.

**गैरवापर रोखणे गरजेचे**

खोटी माहिती, बनावट छायाचित्रे व व्हिडिओ, ऑनलाईन फसवणूक आणि व्यक्तींच्या गोपनीयतेचा गैरवापर यामुळे एआयच्या वापरासोबत जबाबदारीही वाढते.

आजच्या आधुनिक युगात कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय आपल्या जीवनाचा महत्त्वाचा भाग बनत आहे. मोबाईल, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, बँकिंग आणि व्यवसाय अशा अनेक क्षेत्रांत अख चा वापर वाढला आहे. त्यामुळे कामे जलद, सोपी आणि अचूक होण्यास मदत होत आहे. एआय मुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी माहिती मिळते, डॉक्टरांना रोगाचे निदान करण्यास मदत होते, शेतकऱ्यांना हवामान व पिकांबाबत माहिती मिळू शकते. उद्योगांमध्ये उत्पादनक्षमता वाढवण्यासाठीही एआय उपयुक्त ठरत आहे. त्यामुळे एआय मुळे वेळ आणि मेहनत वाचते. परंतु एआय चे काही नुकसानही आहेत. एआय मुळे काही पारंपरिक नोकऱ्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच खोटी माहिती, बनावट फोटो-व्हिडिओ, ऑनलाइन फसवणूक आणि गोपनीयतेचा गैरवापर यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. विद्यार्थ्यांनी एआयवर पूर्णपणे अवलंबून राहिल्यास त्यांच्या स्वतःच्या विचार करण्याच्या क्षमतेवरही परिणाम होऊ शकतो.

# जलसंधारण : जलसमृद्ध, दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा भक्कम पाया

**✻ जलसंधारण दिन विशेष**

पाणी म्हणजे शेतीचा श्वास आणि विकासाचा आधार आहे. बदलते हवामान आणि घटती भूजल पातळी यामुळे जलसंधारणाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे जतन करून तो जमिनीत मुरवणे, ही काळाची गरज आहे. जलसंधारणातून मातीला नवजीवन, शेतीला आधार आणि भावी पिढ्यांना सुरक्षित भविष्य देण्याची ताकद आहे.

महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.५८ लाख हेक्टर असून, त्यापैकी १७४.७३ लाख हेक्टर क्षेत्र शेतीखाली आहे. राज्यातील सुमारे ८२ टक्के शेती पावसावर अवलंबून असल्याने पावसाच्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. राज्यातील २४१ लाख हेक्टर क्षेत्र पाणलोट विकासासाठी पात्र असून, त्यापैकी १८२.४७ लाख हेक्टर क्षेत्रावर मृद व जलसंधारणाची विविध कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित क्षेत्रावरही नियोजनबद्ध पद्धतीने कामे सुरू आहेत.

महाराष्ट्र शासनाने जलसंधारणाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून विविध प्रभावी योजना राबविल्या आहेत आणि राबवत आहे. राज्याला जलसुरक्षिततेच्या दिशेने सक्षमपणे पुढे नेण्यासाठी मृद व जलसंधारण विभाग सातत्याने कार्यरत असून जलस्रोतांचे संवर्धन, भूजल पुनर्भरण, विकेंद्रित जलसाठ्यांची निर्मिती आणि शाश्वत जलव्यवस्थापनाला प्राधान्य दिले जात आहे.

**जलयुक्त शिवारातून गावांच्या जलसमृद्धीकडे**

जलयुक्त शिवार अभियानामुळे राज्यातील अनेक गावांमध्ये जलसाठे वाढले, विहिरींच्या पाणीपातळीत सुधारणा झाली आणि संरक्षित सिंचनाला चालना मिळाली. ज्या शेतकऱ्यांना पूर्वी वर्षातून एकच पीक घेता येत होते, अशा अनेक भागांत दुबार पिकांच्या संधी निर्माण झाल्या आहेत. जलसंधारणामुळे निर्माण होणारे संरक्षित सिंचन केवळ शेतीपुरते मर्यादित राहत नाही, तर ग्रामीण बाजारपेठ, रोजगार, दुग्धव्यवसाय आणि लघुउद्योगांनाही चालना देते.

जलयुक्त शिवार अभियानाच्या



पहिल्या टप्प्यातील यशानंतर जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत राज्यातील ५,८५८ गावांमध्ये सुमारे १.४३ लाखांहून अधिक कामे प्रस्तावित झाली आहेत. त्यापैकी १.२४ लाखांपेक्षा अधिक कामे पूर्ण झाली आहेत. जुलै २०२६ अखेर या अभियानावर २,३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी खर्च करण्यात आला आहे.

**गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार– पाण्यासोबत मातीलाही नवजीवन**

'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार' ही योजना पर्यावरण आणि शेती यांचा सुंदर समन्वय साधणारी आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे पाणीसाठवण क्षमता वाढते, तर तोच सुपीक गाळ शेतात टाकल्यामुळे जमिनीची गुणवत्ता आणि उत्पादन क्षमता सुधारण्यास मदत होते.

२०२३-२४ ते २०२५-२६ या कालावधीत राज्यातील ३,३०५ जलाशयांमधून ९८०.५० लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला असून, तो सुमारे १ लाख ९३ हजार एकर क्षेत्रावर पसरविण्यात आला आहे. यासाठी सुमारे ३४५ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून, ८१,११४ स.घ.मी. पाणीसाठा पुनर्स्थापित झाला आहे. म्हणजेच जलसंधारण हे शेतीला केवळ पाणी देत नाही, तर जमिनीलाही नवजीवन देते.

**भूजल पुनर्भरण–भविष्याच्या जलसुरक्षेची गुरुकिल्ली**

भूजल पुनर्भरण हा जलसंधारणाचा अत्यंत महत्वाचा नैसर्गिक फायदा आहे. गेल्या काही दशकांत भूजलाचा मोठ्या प्रमाणावर उपसा झाल्यामुळे अनेक भागांत विहिरी कोरड्या पडणे, बोअरवेलची खोली वाढणे आणि उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता कमी होणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. याचा शेतीसोबतच संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होतो.

पावसाचे पाणी योग्य पद्धतीने अडवून जमिनीत मुरविले, तर भूजल पातळी सुधारण्यास मदत होते. ही प्रक्रिया केवळ शेतीसाठी नव्हे, तर पिण्याच्या पाण्याच्या दीर्घकालीन उपलब्धतेसाठीही अत्यंत महत्त्वाची आहे. भविष्यातील गंभीर पाणीटंचाईचे संकट टाळायचे असेल, तर भूजल संवर्धन आणि पुनर्भरणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.

**जलसंधारण म्हणजे पर्यावरणाचेही संवर्धन**

जलसंधारणाचा पर्यावरणावरही अत्यंत सकारात्मक परिणाम होतो. एखाद्या भागात पाणी टिकून राहिले, तर तेथील जैवविविधतेला आधार मिळतो. वृक्षसंवर्धनाला चालना मिळते, जमिनीतील ओलावा टिकतो आणि नैसर्गिक परिसंस्था मजबूत होण्यास मदत होते. अनेक ठिकाणी जलसंधारणाच्या कामांनंतर स्थानिक जैवविविधता आणि जलचरांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्याची उदाहरणे दिसून येतात. त्यामुळे जलसंधारण ही केवळ विकासाची योजना नसून निसर्गाशी असलेले आपले नाते अधिक दृढ करण्याची प्रक्रिया आहे.

**हवामान बदलाच्या आव्हानाला जलसंधारणाचे उत्तर**

आज हवामान बदल हे जगासमोरील सर्वात गंभीर आव्हानांपैकी एक आहे. पावसाचे स्वरूप बदलत आहे. काही दिवसांत अतिवृष्टी आणि त्यानंतर दीर्घ काळ पावसाचा खंड असे चित्र अनेक भागांत दिसून येते. अशा परिस्थितीत केवळ मोठी धरणे किंवा पारंपरिक सिंचन व्यवस्था पुरेशी ठरणार नाही.

गाव पातळीवर पाणी अडवणे, पाणलोट विकास करणे, नैसर्गिक जलमार्ग जिवंत ठेवणे, पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे आणि स्थानिक जलस्रोत मजबूत करणे हा शाश्वत मार्ग आहे. हवामान बदल आणि पर्जन्यमानातील अनिश्चिततेचा विचार करून मृद व जलसंधारण विभागाने जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आणि लघु सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती दिली आहे. आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यावरही भर दिला जात आहे.

**गुणवत्तापूर्ण कामे आणि कालबद्ध अंमलबजावणी**

या सर्व उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाची महत्वपूर्ण भूमिका आहे. विभागाच्या नव्या प्रशासकीय आकृतिबंधाला मंजुरी मिळाल्यानंतर प्रकल्पांच्या अंमलबजावणीला अधिक गती मिळाली आहे. मंजूर कामे मूळ आराखड्यानुसार आणि निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. गुणवत्तापूर्ण कामांसाठी स्वतंत्र मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या असून, मालगुजारी तलावांच्या पुनरुज्जीवनासारख्या महत्त्वाच्या उपक्रमांनाही प्राधान्य दिले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून जलसंधारण अधिक परिणामकारक करण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे.

**प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून ५.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर कामे**

केंद्र आणि राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नांतून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये १४० प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या माध्यमातून सुमारे ५.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर जलसंधारण, भूजल पुनर्भरण, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेला चालना देणारी विविध कामे सुरू आहेत. या योजनेचे एकूण प्रकल्पमूल्य १,२५१.११ कोटी रुपये असून, जुलै २०२६ अखेर सुमारे १,००३ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे.

मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन, सिमेंट बंधारे, पाणलोट विकास, नाला खोलीकरण, भूजल पुनर्भरण आणि लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या जलसंवर्धन उपक्रमांची प्रभावी सांगड घालत महाराष्ट्र जलसुरक्षिततेच्या दिशेने भक्कम वाटचाल करत आहे. नाला खोलीकरणाबरोबरच बांबू लागवडीसारख्या पर्यावरणपूरक उपक्रमांवरही भर देण्यात आला आहे. विदर्भातील मालगुजारी तलावांची कामे वेळेत पूर्ण करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हा दृष्टिकोन केवळ पाणी साठविण्यापुरता मर्यादित नसून जलस्रोतांचे दीर्घकालीन संवर्धन सुनिश्चित करणारा आहे.

**जलसंधारण दिनातून राज्यव्यापी लोकचळवळ**

महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्राला दूरदृष्टी आणि व्यापक दिशा देणारे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने राज्यात १५ ते २१ ऑगस्ट २०२६ दरम्यान 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येत आहे.


या अभियानाचा महत्वाचा भाग म्हणून आज २१ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांत 'महा वॉकेथॉन २०२६ वॉक फॉर वॉटर' आयोजित करण्यात आली आहे. माती वाचवा , पाणी जपा , सुरक्षित भविष्य घडवा हा या अभियानाचा मुख्य संदेश आहे. सर्व जिल्ह्यांत ३ कि.मी. 'वॉक फॉर वॉटर' आणि सामूहिक मृद व जलसंधारण शपथ आयोजित करण्यात आली आहे. नागरिक, युवक, विद्यार्थी, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि विविध क्षेत्रांतील नागरिकांना या उपक्रमातून जलसंधारणाच्या लोकचळवळीशी जोडण्याचा प्रयत्न आहे.



■ – संकलन
**संजय राठोड**
**मंत्री, मृद व जलसंधारण**
**महाराष्ट्र शासन**

# ... लहानपण देगा देवा !

लहानपण... हे शब्द जरी उच्चारले तरी मनात एक वेगळीच शांतता आणि गोडवा निर्माण होतो. प्रत्येकाला ते दिवस पुन्हा जगावेसे वाटतात. पण निघून गेलेली वेळ कधीच परत येत नाही. खरंच, कोटी रुपये मोजले तरी न मिळणारा तो क्षण म्हणजे लहानपण.




५ वर्षांपर्यंतचे जीवन म्हणजे बिनधास्तपणाचा काळ. ना शाळेची चिंता, ना भुके-तहानीची जाणीव. फक्त मित्र आणि खेळ. काकड्यांचा मांडव, मातीचे घर, गाडी, कबड्डी, खो-खो, लपंडाव... दिवस कसा जातो? हेच कळायचे नाही. कुणी मारले तरी एक मिनिटात विसरून पुन्हा खेळायला तयार. घरी तक्रार केली तर उलट अजून मार पडायचा. तरीही राग नव्हता, लोभ नव्हता. फक्त निमर्ळ आनंद होता.

शाळा सुरू झाली तरी मजा काही कमी झाली नाही. गुरुजी मारायचे पण आदर तसाच होता. शाळा सुटली की दप्तर फेकून थेट मैदानावर. कधी कुस्ती, कधी क्रिकेट. परीक्षा जवळ आली तरी खेळ पहिल्या क्रमांकावर. मित्राचा आवाज आला की 'आई बोलावतेय' म्हणून धावत घरी जाऊन पुन्हा खेळायला यायचो. नदी जवळ असल्याने उन्हाळ्यात पोहायला जाणे म्हणजे पर्वणीच. कधी जास्त पाणी आले की भीती वाटायची, पण तरीही जात होतो.

त्या काळात टीव्ही नव्हता, मोबाईल नव्हता. मनोरंजन म्हणजे चोर-पोलीस, लगोरी, सागरगोट्या. रामायण-महाभारत लागले की पूर्ण गाव एका घरी जमायचे. नंतर व्हिडीओ कॅसेट आणून रात्री पिक्चर दाखवायचो. लोकही मोठ्या मनाने मदत करायचे. सणासुदीला नाटक, भजन, देवीचा जागर... सगळ्यात एकोपा होता.

पाऊस न पडला की गावाला पाणी आणण्याची जबाबदारी आमचीच. १५ दिवसांनी पाणी आले की लोक आनंदाने दान द्यायचे. त्या पैशातून गावजेवण व्हायचे. फोन नव्हते, पण माणसे जवळ होती. घरातील म्हातारे गोष्टी सांगायचे. भांडण क्वचितच व्हायचे. झाले तरी थोड्या वेळात पुन्हा मैत्री.

आज सर्व काही आहे. टीव्ही, मोबाईल, सुविधा. पण ती मजा नाही. आज माणूस व्यस्त आहे. वेळ कोणाकडेच नाही. पैसा आहे पण समाधान नाही. तंत्रज्ञानाने जवळ आणले, पण मने दूर गेली. संत तुकाराम म्हणतात, 'माणसाने सदैव नम्र असावे'. लहानपणी आपण हेच होतो. ना गर्व, ना अहंकार. फक्त देण्याची वृत्ती. मोठे झाल्यावर सत्ता, पैसा मिळतो पण संवेदनशीलता हरवते. लहानपणी केलेल्या खोड्यांसाठी मार बसायचा, पण त्याच आठवणी आज हसवतात.

खरंच, 'लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा'. पुन्हा एकदा ते दिवस जगता आले तर? ती मोकळी हवा, ते निर्मळ हसणे, ती बिनधास्त मित्रता... सर्व काही परत मिळाले तर आयुष्य सार्थक होईल.

लहानपण देगा देवा ही संत तुकाराम महाराजांची अत्यंत सुंदर आणि अर्थपूर्ण भावना आहे. लहानपण म्हणजे निरागसता, आनंद, साधेपणा आणि कोणताही अहंकार नसलेले जीवन.

लहान मूल छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधते. त्याच्या मनात कोणाबद्दल द्वेष, मत्सर किंवा कपट नसते. ते मनापासून हसते, खेळते आणि प्रत्येक गोष्ट कुतूहलाने पाहते. मोठे झाल्यावर मात्र जबाबदाऱ्या, चिंता आणि स्पर्धेमुळे मनावरील निरागसपणा कमी होतो.

म्हणूनच संत तुकाराम महाराजांनी देवाकडे पुन्हा त्या निरागस मनाची मागणी केली आहे. मोठे होताना वय वाढले तरी मनातील बालपण, प्रेम, नम्रता आणि माणुसकी कायम ठेवणे हाच या अभंगाचा खरा संदेश आहे.

■ – संकलन
**शेषराव नर्मदा गोपाळ कडू**
**वरुड**
**मो नं. ९९२३९८८७३४**

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# स्व.ठाकरे स्कूल येथे स्वातंत्र्य दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – मिल्लत सोशल वेल्फेअर असोसिएशन शेंदुरजनाघाट द्वारा संचालित स्व.पंजाबराव ठाकरे उर्दू मीडल स्कूल येथे भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी योगीराज मच्छीमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष भिमराव कावनपुरे, अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी मुख्याध्यापक भाऊराव हरले यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. याप्रसंगी विद्यालयाचे व्यवस्थापक एहराज फैसल, रसूल मिस्तरी, शेख अमर, मेहमूद मिस्तरी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी व पालक बहुसंख्येने उपस्थित होते.



# नेक्सस इंटरनॅशनल स्कूल व एस.जी.देशमुख लिटिल स्टार कॉन्व्हेंटमध्ये स्वातंत्र्य दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चांदस वाठोडा** – येथील सुमनबाई उपासे नेक्सस इंटरनॅशनल स्कूल व एस.जी.देशमुख लिटिल स्टार कॉन्व्हेंट स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

न्यू पारंबी मल्टीपर्पज सोसायटीचे अध्यक्ष रंजन उपासे यांचे हस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी सचिव अनिल कांबळे, सहसचिव रामदास पवार, सदस्य चंद्रशेखर पाटणकर, सुरेंद्र हिवसे, पोलीस पाटील प्रमिला गुडधे, पालक प्रतिनिधी मंगेश महाराज गावंडे, सैनिक शैलेश उघडे, आशा वर्कर रिता कडू उपस्थित होते.





यावेळी झेंडा गीत, राष्ट्रगीत, राज्य गीत, देशभक्ती या सर्व सादर गीतांनी आसमंत दुमदुमला. देशभक्तीपर गीतावर विद्यार्थ्यांनी विविध नृत्य प्रकार व मुका अभिनय प्रस्तुत केला. सैनिकाच्या जीवनातील विविध पैलू प्रकाशित करुन प्रेक्षकांच्या हृदयाचा ठोका चुकविला. पालकांनी स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्यात उपस्थित राहून व राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊन स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित केला. याप्रसंगी मुख्याध्यापिका रोशनी कांबळे यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे संचालन नेहा रामदे तर आभार कृतिका पिकले यांनी केले. यावेळी शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# योगीराज बाबा आश्रम येथे स्वातंत्र्य दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चांदस वाठोडा** – श्री सदगुरु योगीराज बाबा आश्रम हनुमान पेठ मुसळखेडा येथे दरवर्षीप्रमाणे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यातआला.

या कार्यक्रमाची सुरुवात रमेश धोटे यांचे हस्ते सकाळी ध्वजारोहणाने करण्यात आली. यावेळी योगीराज माऊलींचे भक्त, सेवेकरी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देऊन राष्ट्रगीत गायले. यावेळी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांचे स्मरण करण्यात आले तसेच देशाची एकता, अखंडता आणि प्रगती यासाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय व आनंदी वातावरणात उत्साहात पार पडला. याप्रसंगी श्री योगीराज बहुउद्देशीय संस्था व श्री योगीराज महिला विकास संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.



# एक महिन्यात मराठी शिकण्याची संधी, अन्यथा बॅज तीन महिन्यांसाठी निलंबित

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची कठोर भुमिका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रात व्यावसायिक प्रवासी वाहने चालविणाऱ्या चालकांना प्रवाशांशी सुसंवाद साधता यावा, यासाठी व्यवहारिक मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमाच्या अंमलबजावणीसाठी राज्यभर तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. ज्या चालकांना व्यवहारिक मराठीचे ज्ञान नसल्याचे तपासणीत आढळेल, त्यांना नोटीस बजावून एक महिन्याच्या कालावधीत मराठी भाषा शिकणे बंधनकारक करण्यात येत आहे. या मुदतीत मराठी भाषेचे ज्ञान आत्मसात न केल्यास संबंधित चालकाचा



बॅज तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मुंबई महानगर क्षेत्रात झालेल्या तपासणीत ३,९९५ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६०४ चालकांना व्यवहारिक मराठीचे पुरेसे ज्ञान नसल्याचे आढळून आले असून, या सर्वांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. राज्यातील उर्वरित आकडेवारीनुसार आतापर्यंत ४,२२२ चालकांची तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी ६६४ चालकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्रात व्यवसाय करून प्रवाशांशी थेट संवाद साधणाऱ्या व्यावसायिक वाहनचालकांना व्यवहारिक मराठी येणे ही केवळ नियमांची बाब नाही, तर प्रवाशांच्या सोयी-सुरक्षेशी संबंधित बाब आहे. चालकांना मराठी शिकण्यासाठी पुरेसा कालावधी दिला जात आहे. मात्र, दिलेल्या मुदतीनंतरही नियमाचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# जागृत विद्यालयातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना बार्टीमार्फत विविध समाज कल्याणकारी योजनांची माहीती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक स्व.माणिकलालजी गांधी जागृत महाविद्यालयातील वर्ग दहावी व अकरावी बारावीच्या विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाची स्वायत्त संस्था बार्टीमार्फत विविध स्कॉलरशिप योजनांची माहीती तेजस्विनी भोसले आणि दुर्गा झाडे यांनी विद्यार्थ्यांना दिली.

यामध्ये मॅट्रीक व मॅट्रीकोत्तर स्कॉलरशीप योजना, त्याकरीता लागणारी कागदपत्रे आणि प्रत्येक संवर्गासाठी कार्यरत असलेल्या योजनांची माहीती



विद्यार्थ्यांनी आत्मसात केली. वर्ग १० वी, ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांना पुर्वतयारीसाठी शासनाच्या विविध योजना व होणाऱ्या आर्थिक सहाय्याची माहीती देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी वर्ग १० वी, वर्ग ११ वी ,१२ वीचे आर्टस, व्होकेशनल, विज्ञान आणि वाणिज्य विभागाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम मुख्याध्यापक विजय आडे, उपमुख्याध्यापक प्रदीप पाटील व पर्यवेक्षिका माधुरी मेश्राम यांचे मार्गदर्शनात पार पडला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त नागठाणा येथे विशेष कार्यक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त वरुड फोटो व्हिडीओग्राफर युनियनच्या वतीने नागठाणा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहर व ग्रामीण भागातील फोटोग्राफर्स मोठया संख्येने उपस्थित होते.

छायाचित्रकारांच्या विविध समस्या व्यवसायातील बदलते तंत्रज्ञान आधुनिक कॅमेरे व डिजिटल फोटोग्राफी, फोटोग्राफर्सच्या हक्कासंदर्भात यावेळी चर्चा करण्यात आली. फोटोग्राफी क्षेत्रातील सर्व



व्यावसायिकानी एकत्र येउन संघटितपणे काम करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमात जेष्ठ , अनुभवी छायाचित्रकारांचा व व्हिडीओ मिक्सिन्ग व अल्बम डिजाईनर यांचा सत्कारासोबतच नवोदित फोटोग्राफर्सना मार्गदर्शन करण्यात आले.

फोटोग्राफी क्षेत्राच्या विकासासाठी तसेच फोटोग्राफर्सच्या अडचणी सोडविण्यासाठी युनियनच्या माध्यमातुन भविष्यात विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी फोटोग्राफर्स युनियनचे पदाधिकारी, सदस्य व छायाचित्रकार मोठया संख्येने उपस्थित होतें.

कार्यक्रमाचे संचालन धीरज क्षीरसागर तर आभार अध्यक्ष तेजस गोरडे यांनी मानले.

# मंदिरात संचालक व मोबाईल क्रमांकाचा फलक लावा

## कुमार आंडे यांची तहसीलदारांकडे मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – सावंगा (लोणी) येथील पुरातन मंदिर समितीच्या संचालकांची नावे व मोबाईल क्रमांक असलेला फलक तात्काळ लावण्यात यावा, अशी मागणी शिवसेना तालुका प्रमुख कुमार आंडे यांनी तहसीलदारांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे, सावंगा (लोणी) येथील पुरातन मंदिर गावापासून सुमारे अर्धा किलोमीटर अंतरावर



असून दररोज भाविकांची वर्दळ असते. विशेषतः महाशिवरात्री व श्रावण महिन्यात हजारो भाविक दर्शनासाठी येतात. मंदिराला लागुन लोणी धरणाचे पर्यटनस्थळ असल्याने भाविक व पर्यटकांची मोठी गर्दी होते. मंदिर समितीचा बोर्ड नसल्यामुळे मंदिराच्या व्यवस्थेबाबत भाविकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून मंदिर परिसरात यापूर्वी चोरीच्या घटना घडल्या आहेत, भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडल्यास संबंधितांशी संपर्क साधण्यासाठी मंदिर समिती पदाधिकाऱ्यांची माहिती उपलब्ध असणे आवश्यक आहे, त्यामुळे मंदिरामध्ये संचालकांची नावे व त्यांचे मोबाईल क्रमांक असलेला फलक तात्काळ लावण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी शिवसेना तालुका प्रमुख कुमार आंडे यांनी केली आहे.

# आयपीएसओडब्ल्यूए'च्या पाठबळामुळे महिला बचत गटांना बाजारपेठेची मोठी संधी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – इंडियन पोलीस सर्व्हिस ऑफिसर्स वाइव्ज असोसिएशन 'आयपीएसओडब्ल्यूए' यांच्या पुढाकाराने वरळी येथे आयोजित प्रदर्शन व विक्री उपक्रमामुळे विविध स्वयंसेवी संस्था, बचत गट आणि महिला उद्योजकांना आपली उत्पादने सादर करण्यासह त्यांची विक्री करण्याची संधी मिळाली. या उपक्रमातून बचत गटाच्या महिलांना उत्पादन विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत मिळाली आहे.

प्रदर्शनात सहभागी महिला उद्योजकांनी एका दिवसात सुमारे २१ हजार रुपयांची उलाढाल केली. ग्राहकांकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल महिलांनी समाधान व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे महिलांना आर्थिक उत्पन्नासोबतच आत्मविश्वास आणि व्यावसायिक अनुभव मिळण्यास मदत होत असल्याचे अनिर्वेदशक्ती फाऊंडेशनच्या संस्थापक डॉ. आर. विमला (सेवानिवृत्त भा.प्र.से.) यांनी सांगितले. त्यांनी 'आयपीएसओडब्ल्यूए'च्या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

अनिर्वेदशक्ती फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध बचत गटांनी तयार केलेली दर्जेदार उत्पादने प्रदर्शनात मांडण्यात आली. यामध्ये ओमसाई बचत गटाचे कडधान्य, पंचशील पापड्या, सावित्रीबाई फुले उत्पादक गटाचे तूप व तांदूळ, बिरवाडकर टीचे विविध फ्लेवर्समधील चहा, रायगड येथील कॉफी, हाताने तयार केलेल्या राख्या तसेच लाकडी घाण्यावर काढलेले वूड प्रेस्ड तेल यांचा समावेश होता.

बचत गटातील महिलांना मुख्य प्रवाहातील बाजारपेठेशी जोडण्यासाठी अशा व्यासपीठांची महत्त्वाची भूमिका असून, ग्रामीण व निमशहरी भागातील महिलांनी तयार केलेली उत्पादने शहरी ग्राहकांपर्यंत पोहोचणे असल्याचे सांगितले.

## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |
| मका - | २२०० - | २३०० |

## स्व.इंदिराबाई विश्वनाथजी देशमुख विद्यालयामध्ये

# स्वातंत्र्य दिन मान्यवरांचे उपस्थितीत उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथुन जवळच असलेल्या अमडापुर येथील कृष्णाई शिक्षण संस्था व्दारा संचालित स्व.इंदिराबाई विश्वनाथजी देशमुख विद्यालयामध्ये भारतीय स्वातंत्र्य दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

येथील ध्वजारोहण माजी सरपंच वासुदेव सोनारे यांचे हस्ते पार पडले. याप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षक कृष्णा साबळे, प्रतिष्ठित नागरिक दुर्वास पाटील बहुरुपी,



सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी राजेंद्र साबळे, कृष्णाई शिक्षण संस्थाध्यक्ष प्रा.सुभाष बारस्कर, उपाध्यक्ष प्रभाकर भुंबर, सचिव बाबाराव देशमुख यांचेसह मुख्याध्यापक राजेंद्र काकडे, ग्रामपंचायत पदाधिकारी, जि.प.प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, गावातील प्रतिष्ठीत नागरिक, स्व.इंदिराबाई विश्वनाथजी देशमुख विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाबाबत भाषणे दिली तर प्रमुख अतिथी यांनी सुध्दा देशाला स्वातंत्र्य कसे मिळाले? याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन सुखदेव पखाले, प्रास्तविक मुख्याध्यापक राजेंद्र काकडे तर आभार जयंत पाटील यांनी मानले.



**वरुड –** विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबददल गिरीश गांधी यांचा शाल व पुष्पगुच्छ देवुन सत्कार करतांना विदर्भ साहित्य संघाच्या वरुड शाखेचे सदस्य प्रमोद गणोरकर, श्रीमती उषा चौधरी, प्रा.आशिष घाटोळे, प्रा.अरुण कावनपुरे, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष रितेश शहा, देशबंधुदास वाचनालयाचे चंद्रकांत चांगदे व प्रा.किशोर तडस.

# मेडिकल- मेयोमधील कामांची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी

## सर्पदंश पीडित बालिकेच्या प्रकृतीची चौकशी

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

***नागपुर*** – शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) तसेच इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) येथे सुरू असलेल्या विविध विकासकामांची तसेच वैद्यकीय सुविधांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी करून समाधान व्यक्त केले. त्याचप्रमाणे गडचिरोली जिल्ह्यातील जपतलाई येथील सर्पदंश पीडित बालिकेच्या प्रकृतीचीही मुख्यमंत्र्यांनी चौकशी केली.

नागपुरातील मेडिकल आणि मेयो या दोन मोठ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांना विविध विकास कामांसाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. या कामांची प्रगती पाहण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी येथे भेट दिली. रुग्ण तसेच रुग्णांचे नातेवाईक यांच्याही दृष्टीने या दोन्ही रुग्णालयांमध्ये विविध सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत तसेच अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांची निर्मिती या ठिकाणी केली जात आहे. मेडिकलमध्ये एनआयसी, पीआयसीयू येथे भेट देऊन पीआयसीयूमधील व्हेंटिलेटर यूनिटचे लोकार्पण यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचप्रमाणे शस्त्रक्रियागृह, सर्जिकल आयसीयू येथेही मुख्यमंत्र्यांनी पाहणी करून कामाचा वेग वाढविण्याच्या सूचना केल्या.

अधिष्ठाता डॉ. राज गजभिये यांनी सुरू असलेल्या कामांची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली. गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील आदिवासी आश्रम शाळेत सर्पदंश होण्याची घटना नुकतीच घडली होती. या घटनेतील एक विद्यार्थिनी नागपूरला मेडिकलमध्ये दाखल आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या विद्यार्थिनीची भेट घेऊन तिच्या आईशी संवाद साधला. त्याचप्रमाणे या बालिकेच्या प्रकृतीची योग्य काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी डॉक्टरांना दिल्या.उपअधिष्ठाता डॉ.देवेंद्र माहोरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे, आ. मोहन मते, नगरसेवक रितेश गावंडे यावेळी उपस्थित होते.

### मेयो येथे पाहणी

मुख्यमंत्री फडणवीस यांनी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथेही पाहणी केली. सध्या मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण यांनी त्यांचे स्वागत केले. या रुग्णालयात मेडिकल ब्लॉक, सर्जिकल ब्लॉक, शस्त्रक्रियागृह यांची पाहणी करून त्यांनी अधिकाऱ्यांशी संवाद साधला. झालेल्या कामांविषयी समाधान व्यक्त करतानाच कामाचा वेग



### पत्नीच्या त्रासाल

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

**अमरावती** – पर्यटन संचालनालय प्रादेशिक, अमरावती अंतर्गत अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील कृषी पर्यटन केंद्र संचालकांसाठी १८ ऑगस्ट २०२६ रोजी 'मामाचं वावर' कृषी पर्यटन केंद्र, मौजे वळती, ता.चिखली, जि.बुलढाणा येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला अमरावती व छत्रपती संभाजीनगर विभागातील विविध जिल्ह्यांतून आलेले कृषी पर्यटन केंद्र संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेला अनेक मान्यवर उपस्थित होते.

# बचत गटांच्या माध्यमातून महिलांमध्ये वित्तीय साक्षरता : आ.सुलभा खोडके

*(प्रतिनिधी वरूड दर्पण)*

**अमरावती** – बचत गटांमुळे महिला सक्षम बनत असून त्यांच्यामध्ये वित्तीय साक्षरताही वाढत आहे. बचत गटांच्या माध्यमातून आत्मनिर्भर होण्यासाठी महिला पुढाकार घेत आहेत. महिला बचत गटांना स्वयंपूर्ण बनवून त्यांना सहज भांडवल उपलब्ध व्हावे यासाठी अमरावती जिल्हा सिद्धी विनायक महिला बचतगट सहकारी पतसंस्था अग्रणी व कटिबद्ध असल्याचा विश्वास पतसंस्थेच्या अध्यक्ष आमदार सुलभा खोडके यांनी व्यक्त केला.




गाडगे नगर स्थित संत गाडगे बाबा मंगलधाम सभागृहात अमरावती जिल्हा सिद्धी विनायक महिला बचतगट सहकारी पतसंस्था मर्यादित, अमरावती ची २४ वी वार्षिक आमसभा मोठ्या थाटात संपन्न झाली. पतसंस्था अध्यक्ष आमदार सुलभा खोडके यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या वार्षिक आमसभेत व्यासपीठावर संचालक स्नेहा रायटे, छबु मातकर, सुचिता काळे, उषा पाटील, माधुरी भणग, वर्षा कुऱ्हेकर, सरोज चिखलकर, पूर्णिमा फंदे, पतसंस्थेच्या व्यवस्थापक-निलभा ठाकरे आदी उपस्थित होते.

व्यवस्थापक निलभा ठाकरे आदी उपस्थित होते. यावेळी आमसभेच्या कामकाजा दरम्यान अनुराधा बरडे यांनी संस्थेच्या वर्ष २०२५-२०२६ च्या वार्षिक अहवालाचे वाचन केले.

# शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षकांच्या २,४२१ पदांसाठी मेगाभरती

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

**अमरावती** – महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. 'पवित्र' पोर्टलद्वारे वर्ग ३ संवर्गातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) अशी एकूण २ हजार ४२१ रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. या भरतीमुळे राज्यातील पात्र उमेदवारांना शिक्षक सेवेत प्रवेशाची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. अशी माहिती नाशिक येथील आदिवासी विकास लीना बनसोड यांनी दिली.

आदिवासी विकास विभागाच्या नाशिक, ठाणे, अमरावती आणि नागपूर या चारही विभागांतील शासकीय आश्रमशाळांमधील पदांचा या भरतीमध्ये समावेश आहे. नाशिक विभागात ८२६, ठाणे विभागात ६१३, नागपूर विभागात ५१४ आणि अमरावती विभागात ४६८ पदे भरण्यात येणार आहेत. यामध्ये प्राथमिक शिक्षक माध्यमिक शिक्षक (मराठी व इंग्रजी माध्यम) तसेच उच्च माध्यमिक शिक्षक या पदांचा समावेश आहे.

या भरतीमध्ये पेसा क्षेत्रातील ८८५ आणि नॉन-पेसा क्षेत्रातील १ हजार ५३६ पदे आहेत. प्राथमिक शिक्षक पदांमध्ये नॉन-पेसा क्षेत्रात ८६२ तर पेसा क्षेत्रात ४३६ जागा उपलब्ध आहेत. इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शिक्षकांसाठी पेसा क्षेत्रात ६७ आणि नॉन-पेसा क्षेत्रात १६१, माध्यमिक शिक्षक पदांसाठी नॉन-पेसा क्षेत्रात ३५२ तर पेसा क्षेत्रात १३८, माध्यमिक शिक्षक पदांसाठी पेसा क्षेत्रात ५ आणि नॉन-पेसा क्षेत्रात २२ जागा, उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पेसा क्षेत्रात २५१ आणि नॉन-पेसा क्षेत्रात १०६, अशा एकूण ३५७ जागा भरण्यात येणार आहेत.

# महाराष्ट्राच्या पशुवैभवाचा राष्ट्रीयस्तरावर दुहेरी सन्मान : 'उमरडा' गाईला

## स्वतंत्र देशी गोवंश, तर माडग्याळ मेंढी प्रजातीला राष्ट्रीय स्तरावर मान्यता

*(प्रतिनीधी वरूड दर्पण)*

**मुंबई** – महाराष्ट्रातील प्रसिद्ध असलेल्या उमरडा या गाईला स्वतंत्र देशी गोवंश म्हणून, तर 'माडग्याळ' प्रजातीच्या मेंढीला राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र व अधिकृत प्रजाती (ब्रीड) म्हणून मान्यता मिळाली आहे. यामुळे राज्यातील उमरडा या स्थानिक गोवंशाचे व माडग्याळ या मेंढी प्रजातीचे संवर्धन, जतन व आनुवंशिक सुधारणा कार्यक्रमांना मोठी चालना मिळणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो, करनाल (हरियाणा) या संस्थेला पाठवलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ही नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. 'भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या' (आयसीएआर) राष्ट्रीय पशु आनुवंशिक संसाधन ब्यूरो, करनाल (हरियाणा) चे संचालक डॉ. एन.एच. मोहन यांनी याबाबतचे अधिकृत पत्र जारी केले आहे. ७ ऑगस्ट २०२६ रोजी पार पडलेल्या 'आयसीएआर ब्रीड रजिस्ट्रेशन कमिटी'च्या १४ व्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रस्तावाचा पाठपुरावा आणि संशोधनात पुण्यातील 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळ', महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर तसेच कर्नाटक येथील कृषी व पशुवैद्यकीय विद्यापीठातील तज्ज्ञांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले असल्याचे मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे यांनी सांगितले.

### पारंपरिक पशुधनाच्या संवर्धनाला संस्थात्मक आणि शास्त्रीय बळ – पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे



महाराष्ट्राच्या मातीत विकसित झालेल्या उमरडा गाईला स्वतंत्र देशी गोवंश म्हणून आणि माडग्याळ मेंढीला स्वतंत्र अधिकृत प्रजाती म्हणून मिळालेली राष्ट्रीय मान्यता ही राज्यातील पशुपालकांसाठी अभिमानाची बाब आहे. या मान्यतेमुळे आपल्या पारंपरिक पशुधनाच्या संवर्धनाला संस्थात्मक आणि शास्त्रीय बळ मिळणार असून, भविष्यात पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्यासाठीही त्याचा उपयोग होईल. राज्यातील स्थानिक गोवंश व मेंढी प्रजातींचे जतन करतानाच त्यांची उत्पादकता आणि आनुवंशिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शासन आवश्यक त्या सर्व उपाययोजना करेल. महाराष्ट्राच्या पशुधनाची ही वैशिष्ट्यपूर्ण ओळख देशाच्या पशुधन क्षेत्रात अधिक ठळकपणे निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

### शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करण्यासाठी आता अधिक व्यापक संधी उपलब्ध – डॉ. रामास्वामी एन.

उमरडा गोवंश आणि माडग्याळ मेंढीला राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र अधिकृत ब्रीड म्हणून मिळालेली मान्यता ही महाराष्ट्राच्या पशुधन संपदेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची उपलब्धी आहे. या दोन्ही स्थानिक प्रजातींची वैशिष्ट्ये, आनुवंशिक क्षमता आणि स्थानिक परिस्थितीशी असलेली अनुकूलता यांचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करण्यासाठी आता अधिक व्यापक संधी उपलब्ध झाल्या आहेत. पशुपालक, संशोधक, विद्यापीठे आणि संबंधित संस्थांच्या समन्वयातून या प्रजातींचे जतन, संवर्धन आणि आनुवंशिक सुधारणा यांना अधिक गती देण्यात येईल. महाराष्ट्राच्या स्थानिक पशुधनाला राष्ट्रीय ओळख मिळवून देण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील राहील, असे पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन.यांनी सांगितले.

### स्थानिक पशुपालकांना होणार फायदा : डॉ. किरण पाटील

राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र ओळख मिळाल्यामुळे आता उमरडा या गोवंशाच्या व माडग्याळ या मेंढी प्रजातीच्या जतन, संवर्धन व सुधारित प्रजननासाठी सरकारी स्तरावर विशेष योजना व निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, ज्यामुळे स्थानिक पशुपालकांना मोठा फायदा होईल. महाराष्ट्र शासनाचा पशुसंवर्धन विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळ, पुणे व महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर तसेच संशोधन क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांच्या प्रदीर्घ अभ्यास व सातत्यपूर्ण पाठपुराव्याला या निर्णयामुळे मोठे यश मिळाले आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७१७/२०२६** **ने.ता.२९/०९/२०२६**

**अर्जदार :-** १) नंदकिशोर गणपत खापरे, वय अं.४१ वर्ष, धंदा-मजुरी, २) शिवराम गणपत खापरे, वय अं.४० वर्ष, धंदा-मजुरी, रा.सातनुर, ता.वरुड, ३) देवना श्रीराम मानमोडे, वय अं.५३ वर्ष, रा.धनोरा, ता.जि.छिंदवाडा, ४) दुर्गा झनक खवसे, वय अं.६८ वर्ष, धंदा- घरकाम, रा.शेंदुरजनाघाट ता.वरुड, ५) सुनिता सुर्यभान पराडकर, वय अं.६७ वर्ष, धंदा- घरकाम, रा.आजनगाव ता.जि.छिंडवाडा, ६) अनिता टिकाराम सरोदे, वय अं.४३ वर्ष, धंदा- व्यवसाय, रा.मोराडोंगरी, ता.जि.छिंडवाडा

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत गणपत सुखानी खापरे व मयत जयवंती गणपत खापरे, रा.कारली, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२०/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




अंबाझरी पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यासाठी

# राज्य शासन मनपाला सहकार्य करणार - देवेंद्र फडणवीस

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नागपुर** – नागपूरचे वैभव म्हणून अंबाझरी तलावाकडे पाहिले जाते. पाण्याची व्यवस्था नव्हती तेव्हा नागनदीवरील धरण किंवा साठवण तलाव म्हणून याकडे पाहिले जायचे. अनेक वर्ष या तलावाने पिण्याचे पाणी नागपूर शहराला दिले. मध्यंतरी जलपर्णीने हा तलाव व्यापला होता. मात्र, महानगरपालिकेने जलपर्णी नामशेष करण्यासाठी प्रयत्न केले व ते अत्यंत यशस्वी झाले आहेत. एक उत्तम पर्यटनस्थळ म्हणून हा तलाव विकसित करण्यासाठी राज्य शासन महानगरपालिकेला संपूर्ण



सहकार्य करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

नागपूरची ओळख असलेल्या ऐतिहासिक अंबाझरी तलावाचे सौंदर्य आणि पर्यावरणीय महत्व जपण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने राबविलेल्या जलपर्णी निर्मूलन मोहिमेची मुख्यमंत्री फडणवीस यांनी पाहणी केली. तलाव जलपर्णीमुक्त करण्यासाठी मनपाने केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करत मुख्यमंत्र्यांनी नौकेतून अंबाझरी तलावाची पाहणी केली.

यावेळी महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, माजी महापौर दयाशंकर तिवारी, विविध समित्यांची सभापती, नगरसेवक नगरसेविका यांच्यासह मनपाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**मनपातर्फे विशेष मोहीम**

गेल्या काही महिन्यांपासून अंबाझरी तलावात मोठ्या प्रमाणात पसरलेल्या जलपर्णीच्या निर्मूलनासाठी मनपातर्फे विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. जलपर्णीमुळे तलावाचा मोठा परिसर व्यापला गेला होता. त्यामुळे तलावाचे नैसर्गिक सौंदर्य बाधित होण्यासोबतच जलतरणपटू आणि नौकायनाचा सराव करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागत होता. अंबाझरी तलावाला जलपर्णीच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे विशेष मोहीम हाती घेण्यात आली. सर्वांच्या प्रयत्नातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली.

जलपर्णी काढण्यासाठी जेसीबी आणि वीड हार्वेस्टरचा वापर करण्यात आला. या मोहिमेमुळे तलावातील जलपर्णी मोठ्या प्रमाणात हटविण्यात आली असून अंबाझरी तलावाचा परिसर अधिक स्वच्छ आणि खुला झाला आहे. तलावाच्या संवर्धनासाठी मनपाने केलेल्या या प्रयत्नांची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाणून घेतली आणि उपक्रमाचे कौतुक केले.

## महात्मा ज्योतिबा फुले समग्र वायय ग्रंथाचा सात भाषांमध्ये अनुवाद करणार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नागपुर** – महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनातर्फे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समग्र वाययाचा ग्रंथ हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली आणि गोर बंजारा या सात भाषांमध्ये अनुवाद करण्यात येईल, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली आणि गोर बंजारा या भाषांसाठी साहित्य अकादमी कार्यरत आहेत. या साहित्य अकादमींच्या माध्यमातून साहित्यिक आदान-प्रदानाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रभादेवी येथील पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे एक दिवशीय अनुवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. मराठीतील उत्कृष्ट साहित्यकृतींचा विविध भाषांमध्ये तसेच विविध भाषांतील उत्कृष्ट साहित्यकृतींचा मराठीत अनुवाद करण्यास प्रोत्साहन देणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे.

# ६ दिवसांपासुन सुरु असलेले आमरण उपोषण आमदारांच्या मध्यस्थीने सुटले

## सरपंच, सचिव यांनी मासिक सभा बोलावुन दिले नियुक्ती पत्र

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – गेल्या ६ दिवसांपासुन ग्रामपंचायत कार्यालयामध्ये दीक्षीत अरुण वानखडे यांना शिपाई म्हणुन रुजु करुन घेण्याकरीता पंचायत समिती कार्यालयासमोर सुरु असलेले आमरण उपोषण आज अखेर दुपारच्या सुमारास सरपंच लिला कुमरे व सचिव नरेंद्र इंगळे यांनी रुजु होण्याबाबतचे लेखी नियुक्ती पत्र दिल्यानंतर मागे घेण्यात आले. विशेष म्हणजे या प्रकरणात आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी मोलाची भुमिका निभावली.

जामगांव (खडका) ग्रामपंचायतीने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी शिपाई पदासाठी नियमानुसार लेखी परीक्षा घेतली होती. या परीक्षेत एकूण २१ उमेदवारांनी सहभाग घेतला होता. परीक्षेचा निकाल व्हिडिओ रेकॉर्डिंग करुन सरपंच, उपसरपंच, ग्राम सेवक, विस्तार अधिकारी तसेच इतर ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपस्थित जाहीर



करण्यात आला, ज्यामध्ये दीक्षित वानखडे हे सर्वाधिक गुण मिळवुन प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. मात्र काही उमेदवारांनी तक्रार केल्याचे कारण दाखवित ग्रामपंचायत सचिव व सरपंच यांनी त्यांना नियुक्ती पत्र देण्यास टाळाटाळ केली.

या तक्रारींच्या चौकशीसाठी पंचायत समिती विस्तार अधिकारी रामटेके यांनी चौकशी केली. त्यांनी ४ ऑगस्ट २०२५ रोजी सादर केलेल्या अहवालात उत्तीर्ण उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यास कोणतीही हरकत नसल्याचे स्पष्ट केले होते तसेच या प्रकरणी गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केल्यानंतर घेतलेल्या विविध सुनावण्यांमध्ये नियमानुसार शिपाई पदाची यादी जाहीर करून ४ वेळा नियुक्ती आदेश पत्र देण्याचे निर्देश देण्यात आले होते परंतु ग्रामपंचायत कडून अद्यापही कोणतीही कार्यवाही झालेली नाही अखेर दीक्षीत वानखडे यांनी १५ ऑगस्ट पासुन पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले होते. त्यांच्या उपोषणाला गावकऱ्यांनी सुध्दा उत्स्फुर्त प्रतिसाद दिला होता.

या उपोषण मंडपाला आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर, तहसिलदार रामदास शेळके, गटविकास अधिकारी खुशाल पिल्लारे, निळकंठ उर्फ बाळु मुरुमकर, सरपंच लिला कुमरे, उपसरपंच निलेश ठाकरे, माजी सरपंच मनोज पेलागडे, ग्रामपंचायत सदस्य यांचेसह अन्य अधिकारी, कर्मचारी, विविध राजकीय नेते व कार्यकर्ते यांनी भेटी दिल्या होत्या. अखेर ५ दिवसांच्या उपोषणानंतर आज (ता.२०) ग्रामपंचायतीची मासिक सभा बोलावुन तशा प्रकारचा ठराव घेवुन जामगांवच्या सरपंच लिला कुमरे व सचिव नरेंद्र इंगळे यांनी रुजु होण्याबाबतचे लेखी नियुक्ती पत्र दिल्यानंतर अखेर आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांचे हस्ते लिंबु शरबत देवुन उपोषणाची सांगता करण्यात आली.

# मिहान इंडियाकडून विविध उपक्रमांसाठी १ कोटी ३५ लाख रुपयांची मदत

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नागपुर** – मिहान इंडिया लिमिटेडतपर्फे सामाजिक बांधीलकी जपत विविध लोकहिताच्या उपक्रमांसाठी सीएसआर निधीचे वितरण करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विविध संस्था आणि नागपूर महानगरपालिकेला एकूण १ कोटी ३५ लाख रुपयांचे धनादेश रामगिरी या मुख्यमंत्री निवासस्थानी प्रदान करण्यात आले.

यामध्ये जीविका फाऊंडेशनला सर्व्हायकल कॅन्सर लसीकरण अभियानासाठी २५ लाख रुपये देण्यात आले. नागपूर महानगरपालिकेला सांडपाणी व्यवस्थापनासाठी ३५ लाख रुपये, तर महिला सक्षमीकरण प्रकल्पासाठी ३५ लाख रुपये देण्यात आले आहेत. तसेच शहरातील हरित क्षेत्र वाढविण्याच्या उद्देशाने वृक्षारोपणासाठी १० लाख रुपयांचा निधी महापालिकेला देण्यात आला. या वेळी नागपूरच्या महापौर नीता ठाकरे, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी-वखरे आदी मान्यवर उपस्थित होते.

